RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ६] गुरुवार, जानेवारी २१, २०२१/माघ १, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जानेवारी २०२१

**नोटीस**

**कामगार भरपाई अधिनियम, १९२३.**

क्रमांक आयसीई-०२२०/प्र.क्र.१८/ कामगार-६.—कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम २ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदींअनुसार, महाराष्ट्र शासन, याद्वारे,उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये सुधारणा करण्यासाठी अधिसूचना काढण्याचा शासनाचा उद्देश घोषित करीत असून, त्याचे प्रारूप यासोबत जोडलेले आहे; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, उक्त प्रारूप, शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

२. उक्त प्रारूपाच्या बाबतीत, उपरोक्त तीन महिन्यांच्या कालावधीत, महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे जे कोणतेही आक्षेप व सूचना प्राप्त होतील त्या शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

प्रारूप अधिसूचना

क्रमांक आयसीई-०२२०/प्र.क्र.१८/ कामगार-६.—ज्याअर्थी, कामगार भरपाई अधिनियम,१९२३ (१९२३ चा ८), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या अनुसूची-दोनमध्ये सुधारणा करण्यासाठी, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग चार-अ, असाधारण, दिनांक २१ जानेवारी २०२१ यामध्ये प्रसिद्ध केलेल्या नोटीस, क्रमांक: आयसीई-०२२०/प्र.क्र.१८/कामगार-६, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक २१ जानेवारी २०२१ याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** उक्त नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत, आक्षेप व सूचना मागविलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त तीन महिन्यांच्या कालावधीत, उक्त प्रस्तावाच्या बाबतीत, शासनाकडे कोणतेही आक्षेप व सूचना प्राप्त झालेल्या नाहीत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा.१५) याच्या कलम २ च्या खंड (४) च्या अर्थांतर्गत, महाराष्ट्र दुकाने व आस्थापनांमध्ये नोकरीस असलेल्या व्यक्तींच्या बाबतीतील व्यवसाय धोकादायक आहे, अशी खात्री पटल्यावर, महाराष्ट्र शासनास, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या पोट-कलम (३) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या अनुसूची- दोनमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिनियमाच्या अनुसूची- दोनमध्ये, (अकरा नऊ) नंतर पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

"(ठ) ज्यांना महाराष्ट्र दुकाने व आस्थापना ( नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन ) अधिनियम,२०१७ (२०१७ चा महा.१५) याच्या तरतुदी लागू आहेत अशा कोणत्याही दुकानांमध्ये किंवा आस्थापनांमध्ये, प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही अभिकरणाद्वारे, कोणत्याही संख्येत नोकरीस असलेले.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अरुण व. शिंदे,**
कक्ष अधिकारी.

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No.ICE- 0220/C.R.18/Lab-6, Dated the 21st January 2021 published in the *Maharashtra Government Gazette*, Part IV-A, Extraordinary is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. M. SATHE,
**Joint Secretary to Government.**

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 21st January 2021

*NOTICE*

EMPLOYEE'S COMPENSATION ACT, 1923.

No. ICE- 0220/C.R.18/Lab-6.— In pursuance of the provisions of sub-section *(3)* of section 2 of the Employee's Compensation Act, 1923 (8 of 1923 ), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra hereby announces its intention to issue a notification to amend the Schedule II to the said Act, the draft of which is appended hereto; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government after expiry of a period of three months from the date of publication of this Notice in the *Maharashtra Government Gazette*.

2. Any objection or suggestion with respect to the said draft which may be received within the aforesaid period of three months, by the Principal Secretary (Labour) to the Government of Maharashtra, Industries, Energy and Labour Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, will be considered by the Government.

*DRAFT NOTIFICATION*

No. ICE- 0220/C.R.18/Lab-6.— Whereas, by Notice No. ICE- 0220/C.R.18/Lab-6 Industries, Energy and Labour Department dated the 21st January 2021 published in the *Maharashtra Government Gazette*, Part IV-A, and Extraordinary, dated the 21st January 2021 the Government of Maharashtra has invited objections and suggestions to issue a notification to amend Schedule II to the Employee's Compensation Act, 1923 (8 of 1923), in its application to the State of Maharashtra, within a period of three months from the date of publication of the said Notice in the *Maharashtra Government Gazette* ;

And whereas, no objection or suggestion in respect of the said proposal, has been received by the Government within the said period of three months ;

And whereas, the Government of Maharashtra, on being satisfied that the occupation in respect of the persons employed in the Shops and Establishments within the meaning of clause (4) of section 2 of the Maharashtra Shops

and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 ( Mah. XV of 2017) is hazardous, considers it expedient to amend Schedule to the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*3*) of section 2 of the said Act, the Government of Maharashtra hereby amends Schedule II to the said Act, as follows :—

In Schedule II to the said Act, after (XIix) the following entry shall be added, namely :—

"(L) employed in any capacity, directly or through any agency in any shop or establishment to which the provisions of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 ( Mah. XV of 2017) applies."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARUN V. SHINDE,

Desk Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.